# जिल्हा निवड समिती, पुणे
## जाहिरात क्र. ०१/२०२३
## शुद्धीपत्रक क्र. १

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३

जिल्हा परिषद पुणे च्या आस्थापनेवरील गट-क संवर्गामधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात क्र.०१/२०२३ दिनांक ०५/०८/२०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये ७.१ मधील शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच सामाईक अर्हता विचारात घेता खालील प्रमाणे अंशत: सुधारणा करणेत आलेल्या आहेत. त्याप्रमाणे उमदेवारांनी आपले अर्ज सादर करावेत.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | कनिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या संवर्गासाठी मराठी टंकलेखन आवश्यक करण्यात आलेले आहे, असे जाहिरातीत नमूद आहे.<br><br>तथापि माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी व अनाथ मधून अर्ज करणाऱ्या ज्या उमेदवारांकडे मराठी टंकलेखन नाही, असे उमेदवार देखील अर्ज करू शकतील. |
| २ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाचा ऑनलाईन अर्ज करताना Have you passed recognized equivalent two Years Course in Construction Supervisor? असा प्रश्न विचारणेत आला होता. परंतू सदरचा कोर्स हा एक वर्षाचा असल्यामुळे त्या पदासाठी उमेदवार अर्ज सादर करू शकत नव्हते.<br>तथापि त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून आता Have you passed recognized equivalent Course in Construction Supervisor? असा प्रश्न विचारणेत येत आहे. त्यामुळे सदर पदासाठी इच्छुक उमेदवार आपले अर्ज सादर करू शकतील. |

Helpline No. - ०२० २६१३४८०६

दिनांक - १८/०८/२०२३

सदस्य,<br>
जिल्हा निवड समिती तथा<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
जिल्हा परिषद, पुणे